**KNOWLEDGE FLAME**
**INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)**

# भांडवलशाहीतील जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्य एक समस्या

**प्रा. डॉ. विलास आबासाहेब नरवडे**
खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई
E-mail ID : narwadevilas158@gmail.com
मो. 9021723083

**प्रस्तावना :**

भांडवलशाही, एक आर्थिक व्यवस्था म्हणून प्रथम १४ व्या शतकात पदार्पण झाली, आणि ती आजच्या जागतिक भांडवलशाहीमध्ये विकसित होण्यापूर्वी तीन वेगवेगळ्या ऐतिहासिक युगांमध्ये अस्तित्वात होती. "न्यू डील" भांडवलशाहीपासून आज अस्तित्वात असलेल्या नवउदारवादी आणि जागतिक मॉडेलमध्ये बदलली. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रेटन वुड्स परिषदेत घातला गेला. जगात जागतिकीकरणाचा प्रसार झाल्यानंतर दिसून येणारी एक चांगली बाब म्हणजे जगातल्या दारिद्र्याची अधिक दखल घेण्यात येवू लागली. याचे एक महत्वाचे कारण म्हणजे जागतिकीकरणातील मुक्त व्यापार व मुक्त बाजारपेठ यातून आर्थिक वाढ जोमाने होईल. दारिद्र्याचा प्रश्न सोडवता येईल असे सांगण्यात येत होते, परंतु प्रत्यक्षात तसा अनुभव आला नाही. आणि जागतिकीकरणाच्या विरोधात जगभर जनमत तयार होऊ लागली. यातुनच दारिद्र्याच्या समस्येची दखल घेऊन अनेक विचारवंतांनी आर्थिक वाढीच्या प्रक्रियेसाठी दारिद्र्याच्या प्रश्नाची प्रत्यक्ष मुकाबला करण्याची गरज दर्शविली.

सन १९९१ पासून भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झालेली आहे. हल्ली आपण जागतिकीकरणाच्या युगात जगत आहोत. जागतिकीकरण हा बाजार सुलभता, व्यापार, वाढ, कृषी विकास, रोजगार निर्मिती म्हणजेच देशाचा सर्वांगिण विकास जलद गतीने व्हावा या उद्देशाने पुर्ती करीता जगाने केलेला नवा प्रयोग आहे. भारताच्या संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रयोगाला सुरुवातीपासुनच विरोध तसेच अनेक बुद्धिवंतांनी याचे समर्थनही मोठ्या प्रमाणात केलेले आहे. भारताला आज जागतिकीकरणाचा स्वीकार करून (३२-३३) वर्ष अधिक कालावधी झालेला आहे. भारतावर याचा अनुकूल तसेच काही क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम पहावयास मिळतो आहे. जागतिकीकरणामुळे देशात उद्योग आणि व्यापार क्षेत्र भरभराटीला आलेले आपणास दिसत आहे.

**बीज संज्ञा :-** भांडवलशाही, जागतिकीकरण, दारिद्र्य, बेकारी.

**संशोधन उद्दिष्टे :-**

१) जाग्तीकीकार्नातील आर्थिक वृद्धीमुळे आर्थिक विषमताही वाढली आहे.

२) जागतिकीकरणासोबत दारिद्र्यही वेगाने वाढत आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंध केवळ दुय्यम आधार सामग्रीवर आधारित आहे. माहिती संकलन करतांना क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य इत्यादी स्रोतांचा वापर केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संधोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**भांडवलशाही आणि जागतिकीकरण संबंध :-**

भांडवलशाही आणि जागतिकीकरण यांचा परस्पर संबंध आहे. जागतिकीकरण ही भांडवलशाहीच्या मुक्त व्यापाराची संकल्पना आहे. जागतिकीकरणामुळे विकसित राष्ट्राच्या विविध बहुराष्ट्रीय कंपन्या जगभर विस्ताराच्या आहेत. विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक विकास करण्यासाठी संरक्षणाचे धोरण अवलंबिले. जे उद्योगधंदे नव्याने स्थापन झालीत त्यांच्या विकासाकरिता अशा उद्योगांना संरक्षण दिले पाहिजे हा विचार पुढे आला. जे उद्योगधंदे बाल्यावस्थेत आहेत त्यांच्या विकासाकरिता सरकारी हस्तक्षेप महत्वाच असतो असे समजण्यात येवून या उद्योग्धन्द्यातील उत्पादित वस्तूच्या आयातीवर प्रशुल्काच्या माध्यमातून निर्बंध लाण्यात आले. परंतु १९७०-८० या दशकामध्ये जगात सगळीकडे जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. विकसित राष्ट्रांबरोबरच अविकसित राष्ट्रेही त्यात उडी घेवू लागले.

समाजवाद व साम्यवादी अर्थाव्यवस्थानीही जागतिकीकरण स्वीकारून भांडवलशाहीतील मुक्त व्यापार व मुक्त बाजारपेठेचे अवलंब केले. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत विकसित देशांनी कोणतीही आडकाठी आनू नये असा साधन देशांचा व तेथील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आग्रह आहे. विकसनशील देश भारत व अन्य आशिया, आफ्रिका खंडातील देश विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वतंत्र झाले. पण आजच्या जागतिकीकरणाच्या युगात असे म्हटले जात आहे की स्वदेशी व नियोजन यावर भर देण्यामुळेच या देशाची आर्थिक प्रगती कुंठित राहिली. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात स्वदेशी व नियोजन यांचा त्याग करून या देशांनी मुक्त अर्थव्यवस्थेत

आपली अर्थव्यवस्था सामील करून घेतली पाहिजे. या देशांना विकसित देशांनी आर्थिक मदत करण्याऐवजी त्यांना मुक्त अर्थव्यवस्थेत सामील करण्यासाठी आग्रह धरला पाहिजे.

**भारतातील आर्थिक विषमता :-**

भारतातील १९४८ व १९५६ च्या औद्योगिक धोरणानुसार उद्योगांसाठी निश्चित केलेल्या परवाना धोरणाने खाजगी क्षेत्राच्या व्यक्तीवर मर्यादा आल्या, त्यामुळे उद्योगांना नैसर्गिक मक्तेदारीचे लाभ मिळाले. संरक्षणाच्या धोरणामुळे परकीय स्पर्धेपासून संरक्षण प्राप्त झाले. अनेक उद्योगांनी एकत्रीकरणाचा अवलंब केला, तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करून मोठ्या प्रमाणात उप्भोक्ताची पिळवणूक केली. भारतातील मोठे औद्योगिक घराणे व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन हे आर्थिक धोरणात एम.आर.टी.पी. आयोगा संबंधी सरकारी पातळीवर असा निर्णय घेण्यात आला. मोठ्या कंपन्यांना गुंतवणूकीचे निर्णय घेण्याकरिता एम.आर.टी.पी. आयोगाकडून मंजुरी घेण्याची गरज नाही. केवळ एकाधिकारी प्रतिबंधात्मक आणि अनुचित व्यापार व्यवहारांसंबंधी नियंत्रण व नियमण करण्यावर भर दिला जाईल असे ठरविण्यात आले. अशाप्रकारे एकाधिकारी घराण्यांना त्यांच्या विस्तारासंबंधी, नवीन उद्योगांच्या निर्मितीसंबंधी, विलीनिकरणासंबंधी, किंवा संचालक नियुक्तीसंबंधी सरकारची अनुमती घेण्याची गरज राहणार नाही असे ठरविण्यात आले.

२०११ मध्ये भारताचे 'सकल राष्ट्रीय उत्पन्न' (४४६०) अरब डॉलर झाले. त्यामुळे जागतिक क्रमवारीत भारताने ४ था क्रमांक पटकाविला. त्याचवेळी अमेरिका प्रथम क्रमांकावर, चीन दुसऱ्या क्रमांकावर आणि जपान तिसऱ्या क्रमांकावर होता. मात्र भारताचे प्रति व्यक्ती उत्पन्न केवळ (३५९०) डॉलर इतकेच होते, भारत या देशांना आर्थिक महासत्तेच्या रूपाने वेगाने पुढे येणारे देश असे समजण्यात येवू लागले. परंतु भारत एक महाशक्ती होण्यास सक्षम आहे काय? हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाचे परीक्षण करणे तेवढेच महात्वाचे आहे.

**संशोधन साहित्याचा आढावा :-**

**१) लालिमा सिंग :-**

जागतिकीकरण आणि दारिद्या या शोधनिबंधात लिहितात की, जागतिकीकरणाने एकप्रकारची भिती निर्माण केलेली आहे. जाग्तीकीकार्णामुळे उत्पन्नाची वाटणी विषय पद्धतीने – देश – देशात आणि लोक – लोकात झालेली आहे. तसेच देशाचे सार्वभौमत्वाची मोठी भिती आहे.

**२) राजीव कुमार उपाध्याय :-**

"इम्पॅक्ट ऑन ग्लोबलायझेशन ऑन डीस्ट्रीब्युशन ऑफ इन्कम, पावरटी ॲन्ड इन इक्वॉलीटी इन इंडिया" या शोधनिबंधात स्पष्ट करतात की, जागतिकीकरणात उत्पन्नाची साधने एकवटली असल्याने देशात उच्च पातळीची विषमता निर्माण झालेली आहे. यातून नव्याने दारिद्र्याची समस्या निर्माण होणार आहे.

**दारिद्र्य संकल्पना :-**

भारतातील अनेक समस्यापैकी दारिद्र्य ही भारताच्या अर्थव्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे. जीवनावश्यक अशा अन्न व निवारा या आवश्यक वस्तूंची पूर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्र्य होय. दुसऱ्या शब्दात जगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला (२४०० ते २१००) उपलब्ध न होणाऱ्या व्यक्ति मानले जाते. सापेक्ष गरिबी नेहमीच राहणार पण किमान निरपेक्ष दारिद्र्य कमी करता आले पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने आर्थिक विकासाचा लाभ सर्व
समाजाला झालेला असतो.

**दारिद्याच्या रेषेखाली प्रमाण**

| विभाग | १९९३ ९४- | | २००४-२००५ | |
|---|---|---|---|---|
| | नियोजन आयोग | तेंदुलकर समिती | नियोजन आयोग | तेंडूलकर समिती |
| ग्रामीण | ३७ ३. | ५० १. | २८ ३. | ४१ ८. |
| शहरी | ३२ ४. | ३१ ८. | २५ ७. | २५ ७. |
| एकूण | ३६ ०. | ४५ ३. | २७ ५. | ३७ २. |

Source :- मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक – २०१२ (अर्थसंवाद)

तक्ता क्र. १

**उद्योग क्षेत्रात रोजगारी उपलब्धता**

| सन | रोजगारीची उपलब्धता |
|---|---|
| २००८ | २० ९७. |
| २०११ | २३ ५२. |
| २०१३ | २४ ३६. |
| २०१६ | २४ २९. |
| २०१७ | २४ ४७. |
| २०१८ | २४ ६९. |

संपर्क :www.statista.com/statistics

जागतिकीकरणाची प्रक्रिया आर्थिक तसेच सामाजिक बदलावर भर देते. या बदलाचा आर्थिक पैकी अर्थव्यवस्थेच्या विकासावर परिणाम करणाऱ्या विविध घटकावर भर देतो, यात उद्योग क्षेत्राचा विचार करता देशात जागतिकीकरणाच्या काळात वृद्धी झालेली दिसून येते. यात निर्माण क्षेत्राचा मोलाचा वाटा राहिलेला आहे या उद्योग क्षेत्रात रोजगार उपलब्धता पाहता सन २००८ ते २०१८ या काळात जास्त वाढ झालेली दिसून येत नाही.

तक्ता क्र. २

**सेवा क्षेत्रात रोजगारी उपलब्धता**

| अ.क्र. | सन | सेवा क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २००८ | २५ ९४. |
| २ | २०११ | २७ ५२. |
| ३ | २०१३ | २९ ०४. |
| ४ | २०१६ | ३० ५९. |
| ५ | २०१७ | ३१ ०१. |

| | | |
|---|---|---|
| ६ | २०१८ | ३१ ४५. |

संपर्क – www.statista.com

सेवा क्षेत्राचा अर्थव्यवस्थेच्या विकासात अग्रणी वाटा आहे. अल्पकाळात मोठी रोजगार उपलब्धता या क्षेत्रातून निर्माण करता येते. २००८ पासून सेवा क्षेत्राच्या रोजगार क्षमतेचा विचार केल्यास २०१८ पर्यंत तो साधारणतः ६% वाढलेला आपणास दिसून येतो.

तक्ता क्र. ३

**शेती क्षेत्रात रोजगार उपलब्धता**

| अ.क्र. | सन | शेत क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २००८ | ५३ ०९. |
| २ | २०११ | ४८ ९६. |
| ३ | २०१३ | ४६ ०६. |
| ४ | २०१६ | ४५ १२. |
| ५ | २०१७ | ४४ ५२. |
| ६ | २०१८ | ४३ ८६. |

**संदर्भ** – एकूण रोजगारीच्या निर्मितीत शेती क्षेत्राचा मोठा वाट असल्याचे आपणास दिसून येते. रोजगारीची निर्मिती होणे हे अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता आवश्यक बाब असते.

**संदर्भसूची :-**

१) दत्ता गौरव – "भारतीय अर्थव्यवस्था" एस. चण्द कंपनी प्रा. लि., नवी दिल्ली २०१२.

२) डॉ. पद्माकर दुभाषी – 'जागतिकीकरण, उदारीकरण, आणि अर्थकारण' श्रीविद्या प्रकाशन, पुणे २००६.

३) आर.एम.गोखले – 'भारतीय अर्थव्यवस्था' कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे २०१२.

४) National Sample Survey – 2010-11 – 2013-14.

५) डॉ. जे.एम.पाटील – गरीबीचे अर्थकारण आणि आकड्यांचा खेळ, दैनिक सकाळ, २ मे २०१२.

६) International Monitory Fund, http://www.imf.org.in

७) लोकराज्य, मासिक, फेब्रु २००८.

८) अर्थसंवाद जुलै – सप्टेंबर – २०१२.